# सायबर सुरक्षा उपक्रमाला प्रतिसाद

पुणे, (वा.) क्विक हील फाऊंडेशन ने (क्यूएचएफ) भावी पिढ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी हातभार लावण्यासाठी तसेच तरुणांना सायबर सुरक्षिततेबद्दल प्रशिक्षित करण्यासाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रम सुरु केला आहे. विद्यार्थी एकदा प्रशिक्षित झाले की संपूर्ण समाजात जागरुकता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील. वया उपक्रमांबात बोलताना क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर म्हणाल्या, ''सर्वत्र इंटरनेटचा मोठ्या प्रमाणत वापर होतो आणि तितकेच सायबर गुन्हे देखील वाढले आहेत. सायबर सुरक्षिततेचे समर्थक म्हणून क्विक हील फाऊंडेशन (क्यूएचएफ) देशातील तरूणांना इंटरनेटच्या जबाबदारीने वापराबाबत जागरूक करण्यामध्ये पुढाकार घेते.द्यिार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्यास प्रेरित करण्यासाठी क्विक हील 'अर्न अॅण्ड लर्न'उपक्रमांतर्गत त्यांना मासिक प्रोत्साहन रक्कम आर्थिक सहाय्य स्वरूपात देणार आहे.